**<u>ठळक बातम्या</u>**

- आत्मविश्वासाच्या जोरावरच सगळं काही शक्य असून विकसित भारताचं स्वप्न साकारण्यासाठी त्याचीच आवश्यकता असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- भारत -अमेरिका व्यापार कराराचं सर्वत्र स्वागत/ उद्योग जगतात आनंद
- शेअर बाजारात निर्देशांकांची उसळी, सेन्सेक्समधे ४ हजाराच्या आसपास तर निफ्टीमधे सातशेच्या आसपास वाढ
- युरोपीय देश आणि अमेरिकेबरोबरच्या व्यापार कराराचा मसुदा संसदेत सादर करावा अशी विरोधकांची मागणी/ गदारोळामुळे दोन्ही सभागृहांचं कामकाज दोन वाजेपर्यंत तहकूब

**आणि**

- अहमदाबाद- मुंबई बुलेट ट्रेन प्रकल्पातल्या पालघरमधल्या दुसऱ्या बोगद्याचं खोदकाम पूर्ण झाल्याची रेल्वे मंत्र्यांची घोषणा

<><><><><>

आत्मविश्वासाच्या जोरावरच सगळं काही शक्य असून विकसित भारताचं स्वप्न साकारण्यासाठी त्याचीच आवश्यकता असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे.  भारतातून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या मालावरचं आयातशुल्क २५ टक्क्यांवरुन कमी करुन १८ टक्क्यांवर आणण्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी मान्य केल्याची घोषणा आज प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावर केली. त्यासंदर्भात त्यांनी सांगितलं की, ही भारताच्या जनतेची ताकद आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनल्ड ट्र्म्प यांनीही याबाबत समाज माध्यमावर संदेश प्रसारित केला आहे. भारतीय उत्पादनांवर अमेरिकेत आयात शुल्क २५

टक्क्यांवरून १८ टक्केपर्यंत कमी करण्यात येणार असून या संदर्भातल्या व्यापार करारावर दोन्ही देशांनी सहमती दर्शवली असल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. भारत रशियाकडून तेल खरेदी थांबवणार असून यापुढं अमेरिकन मालावर भारतात लागणारं शुल्क उतरत्या क्रमाने शून्यवर पोहोचेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

<><><><><>

भारत - अमेरिका परस्पर टॅरिफ कपातीबाबतच्या व्यापार कराराचं विविध स्तरातून, विशेषतः उद्योग जगताकडून स्वागत होत आहे. यामुळे उभय देशांमध्ये रोजगार निर्मिती, विकास आणि नवोपक्रमांना चालना मिळेल असं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या करारामुळे दोन्ही देशांची धोरणात्मक भागीदारी बळकट होणार असल्याचं नमूद केलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही भारत - अमेरिका द्विपक्षीय संबंधांच्या दृष्टीने हा मोठा दिवस असल्याचं म्हटलं आहे. हा करार उभयपक्षी हित साधणारा असल्याची प्रतिक्रीया माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे.
तर वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनीही याबद्दल दोन्ही राष्ट्रप्रमुखांचं तसंच जनतेचं अभिनंदन केलं आहे. याखेरीज धर्मेंद्र प्रधान, किरेन रिजिजू, जे पी नड्डा इत्यादी केंद्रीय मंत्र्यांनी य़ा कराराचं स्वागत करणारे संदेश समाजमाध्यमावर लिहीले आहेत.

महाराष्ट्र कायम निर्यातीत अग्रेसर असलेलं राज्य असून या करारामुळे राज्यातल्या व्यवसायासाठी नवं क्षितिज खुलं होईल, आणि राज्यात मोठी गुंतवणूक होईल, असं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. देशाच्या इतर राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनीही या कराराचं स्वागत केलं आहे.

<><><><><>

सीआयआय, फिक्की, रत्न आणि आभूषण उद्योग, पीएचडी सीसीआय, मोबाईल फोन्स, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू आणि संलग्न उत्पादनांच्या निर्यातदारांची संघटना ICEA,मत्स्योत्पादकांची संघटना, अशा विविध उद्योजक आणि व्यापारी संघटनांनी या कराराबद्दल आनंद व्यक्त केला असून यामुळे भारतीय उत्पादनांना अमेरिकेत उठाव मिळेल असा विश्वास व्यक्त केला आहे.

शेअर बाजारात या कराराचे सकारात्मक पडसाद दिसून आले. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ४ हजार दोनशे पेक्षा जास्त अंकांनी उसळला तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी बाराशे अंकांनी वर गेला. सध्या सेन्सेक्स सुमारे २ हजार३०० अंकांनी चढला असून साधारण ८४ हजाराच्या आसपास पोहोचला आहे.

राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी सुमारे ७०० अंकानी वाढला असून २५ हजार ७०० अंकांच्या आसपास व्यवहार करत आहे.

<><><><><>

युरोपियन युनियन  आणि अमेरिका यांच्यासोबतच्या  व्यापार कराराचा मसुदा सभागृहाच्या पटलावर ठेवावा अशी मागणी करत विरोधी  पक्षांनी केलेल्या घोषणाबाजीनंतर दोन्ही सभागृहांचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब झालं.

लोकसभेचं आजचं कामकाज सुरू झाल्यावर सभापती ओम बिर्ला यांनी माजी खासदार दिवंगत सुरुपसिंह नाईक यांना श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात झाली. मात्र विरोधी पक्षाच्या सदस्यांनी भारत-अमेरिका व्यापार कराराचा मुद्दा उपस्थित करत सभापतींच्या आसनासमोर येत घोषणाबाजी सुरू केली. सभागृहात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरल्या आभार प्रस्तावावरल्या चर्चेत तसंच  अर्थसंकल्पावरल्या चर्चेत बोलायला संधी मिळणार आहे, त्यामुळे आता सभागृहाचा वेळ वाया घालू नये असं सभापतींनी सदस्यांना सांगितलं. मात्र गदारोळ

वाढत गेल्यानं सभागृहाचं कामकाज बारा वाजेपर्यंत आणि नंतर दोन वाजेपर्यंत कामकाज तहकूब करण्यात आलं.

**राज्यसभेत** भारत - अमेरिका व्यापार कराराच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभात्याग केला. काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी शून्य प्रहरात हा मुद्दा उपस्थित केला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल रात्री अमेरिका- भारत व्यापार कराराची घोषणा केल्यावरून काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी सरकारवर टीकास्त्र सोडलं. भारत अमेरिकेसाठी आयात शुल्क शून्य करणार असल्याचं ट्रम्प यांनी सांगितलं. याचा परिणाम भारतीय उद्योग, कृषी आणि व्यापारावर होणार आहे, याबद्दल सरकारने खुलासा करावा असं जयराम रमेश यांनी म्हटलं आहे. भारत अमेरिकेकडून वस्तूंची आयात वाढवणार असेल तर मेक इन इंडिया मोहिमेचं काय झालं, असा प्रश्न त्यांनी विचारला. आणि प्रधानमंत्र्यांनी संसद आणि देशाला विश्वासात घेऊन सर्व तपशील जाहीर करावेत अशी मागणी केली.

सरकार भारत - अमेरिका व्यापार करारावर चर्चा करायला तयार असून या कराराची विस्तृत माहिती सभागृहासमोर मांडली जाईल, असं सभागृह नेते जे पी नड्‌डा यांनी सांगितलं. मात्र विरोधी पक्षांनी अध्यक्षांच्या आसनासमोर येत घोषणाबाजी करत सरकारने कराराबद्दल सभागृहाला माहिती द्यावी अशी मागणी केली. सरकारकडूून मागणी मान्य न झाल्यामुळे विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभात्याग केला. त्यानंतर राज्यसभेचं कामकाजही दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब झालं. दरम्यान, वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियूष गोयल आज भारत - अमेरिका व्यापार कराराविषयी संसदेत निवेदन देण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

मुंबई-अहमदाबाद हाय स्पीड रेल्वे प्रकल्पासाठीच्या दुसऱ्या बोगद्याचं खोदकाम काम पूर्ण झाल्याची घोषणा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज केली. महाराष्ट्रात

पालघर जिल्ह्यातला हा दुसरा बोगदा असून बुलेट ट्रेन प्रकल्पाचा हा महत्त्वाचा टप्पा आहे. संपूर्ण पथक या प्रकल्पासाठी वेगाने काम करत असून जग भारताच्या पहिल्या बुलेट ट्रेनची प्रगती पाहत आहे, असं वैष्णव म्हणाले. आतापर्यंत ३३४ किलोमीटरचा लोहमार्ग आणि ४१७ किलोमीटरचा घाट आणि पुलांचं बांधकाम पूर्ण झाल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

<><><><><>

भारत आणि अमेरिके दरम्यान झालेल्या व्यापार कराराबद्दल एनडीए खासदारांनी आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा सत्कार केला. संसद भवन संकुलात झालेल्या एनडीएच्या घटक पक्षांच्या बैठकीत हा सत्कार करण्यात आला. अमेरिकेबरोबरचा व्यापार करार ऐतिहासिक असल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू या सत्कारावेळी म्हणाले. या बैठकीत भाजपचे नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांचाही सत्कार करण्यात आला.

<><><><><>

मणिपूरमध्ये काल दोन अतिरेक्यांसह सात जणांना अटक करण्यात आली असून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. यामध्ये अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या ५ जणांचा समावेश आहे. जप्त केलेल्या शस्त्रांमध्ये मॅगझिनसह एके-४७ रायफल, दोन पिस्तूल, दोन सिंगल-बॅरल रायफल, ११ जिवंत काडतुसे, सात रिकामी काडतुसे, तीन रेडिओ सेट, आयईडी स्फोटकं यांचा समावेश आहे.

<><><><><>

भारतानं पुढील वर्षीच्या आशियाई रायफल शूटिंग अजिंक्यपद स्पर्धेचं यजमानपद मिळवलं आहे. ही स्पर्धा दिल्लीमध्ये होणार असून त्याच्या तारखा लवकरच निश्चित केल्या जातील, अशी माहिती राष्ट्रीय रायफल असोसिएशन ऑफ इंडियानं दिली आहे.

<><><><><>

महिला प्रीमियर लीग क्रिकेटमध्ये,आज बडोदा इथल्या बीसीए मैदानावर गुजरात जायंट्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना होणार आहे. हा सामना संध्याकाळी साडे सात वाजता होईल. या सामन्यातील विजेत्या संघाची येत्या गुरुवारी अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुशी लढत होईल. स्मृती मानधनाच्या नेतृत्वाखाली आरसीबी महिला संघानं लीग टप्प्यात अव्वल स्थान पटकावून अंतिम सामन्यातलं आपलं स्थान आधीच निश्चित केलं आहे.

<><><><><>

हरियाणा इथं सुरु असलेल्या ३५व्या किशोर आणि किशोरी राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी उपांत्यपुर्व फेरीत प्रवेश केला आहे. या सामन्यात किशोर गटात महाराष्ट्र संघाने हरयाणाचा, एक डाव १८ गुणांनी तर किशोरी गटात मणिपुरचा, एक डाव ३३ गुणांनी पराभव केला.

// <><><><><>//